# दया मागू नका ईश्वराच्या आठवणीत राहा

भक्त साधक पुजारी विविध प्रकारे परमात्म्याला पुकारत असतात. नविषिध भक्ती करत आहेत हे सर्व ईश्वर भक्ती विविष्ट इच्छापूर्तीसाठी आहे. असे लक्षात येते, भौतिक प्राप्तीसाठी व ईश्वराची आपल्यावर कृपा दृष्टी व्हावी, म्हणून विविध पूजापाठ साधना इत्यादी करतात. वास्तविक त्यांच्या ईश्वराशी खराखुरा प्रेमभाव, लगाव, समर्पण नसते व आपल्या इच्छा पुर्ण न झाल्यास ते ईश्वराला दोष देतात.

या सर्वांचा ईश्वराप्रती असलेली श्रद्धा, स्नेह व विश्वास डगमगतो किंवा संपतो. ही काय पूजा झाली का? ज्यात संशय उत्पन्न होतो व विनाशी गोष्ट नश्वर गोष्टीसाठी, ही ईश्वर, ही तर ईश्वराशी सौदेबाजी करतात. किती विचित्र बाब आहे. विटंबना आहे की, एकीकडे ईश्वराला जगाचा परमति म्हणतात, प्रार्थना करतात. तू जगाचा पालकर्ता आहे, आणि तुझे लेकरे आहोत. परंतु दुसरीकडे तची लेकरं म्हणून घेऊन त्याच्यावर विश्वास नाही या गोष्टीचा अभिमान ही नाही. मी माझा पिता या जगाचा मालक आहे. जगाचा रक्षक आहे. तर सर्व प्रथम तो माझे कल्याण करेल. आणि तो माझा पिता आहे. तर मी त्याच्याकडे दयेकरीता भीक का मागू मुलगा पित्याकडे कधी भीग मागतो का? मुलगा पित्याकडे भीग नाही तर त्याला स्नेहाने पुकारतो आठवण करतो. आपल्या पित्याचे आपल्या मुलावर स्वाभाविकपणे करुणा व स्नेह असतोच.

तसे राजाचा मुलगाा छोट्या-छोट्या गोष्टीसाठी भीक मागायला लागला आणि देयकरिता विनवणी करायला लागला तर त्याला काय म्हणाल? या नंतर राजाची शान कमी होईल. राजपूत्राचे महत्व सुद्धा कमी होईल. त्याच्याकडे कोणी सन्मानाने पाहणार नाही. येथे आमचा पिता तर राजाचाही राजा आहे. या सृष्टिवरच्या सिमीत भूमीचा राजाचा मालक आहे. जर आपण त्यांचे पुत्र असूनही देयसाठी झोळी पसरतो ही तर त्या महान परमात्म्याचा किती वेळा अपमान होईल. म्हणून ईश्वराच्या लेकरांना तुम्ही देयाला पात्र नाही. दया करणारे आत्मा बना, खऱ्या दिलाने प्रभुला स्मरण करा. तुमची मनोकामना पूर्ण होईल. तुम्ही दात्याचे मुले आहात. दाता असल्याने तुम्हाला काही मागण्याची गरज नाही.

**समर्थ आत्मा बना -** दयेचे पात्र तर दिनदुबळे असतात. ते दुसऱ्यासमोर याचना करतात. लोळण घेतात. परंतु खरे ईश्वर प्रेमी त्यांच्या आठवणीत लीन असलेले राजयोगी आत्मा असतात. ते प्रभु प्रेमात लिन होऊन सदा ईश्वरीय शक्तीनी संपन्न असतात. त्यांचे मन ,हिन, दिन, दुर्बल नसते, प्रभुची आठवण प्रत्येक दुः ख वेदना मिटवते व जीवन खुशहाल व संपन्न बनवते. प्रभुची आठवणीची शक्ती आत्म्याला समर्थ बनविते. निरर्थक गोष्टी मिटवते. इच्छा आणि कामना या पासून दूर राहतात. आणि ते प्राप्ती स्वरुप आत्मे बनतात.

**मागणारे पूज्य बनत नाही -** मानव देवीदेवतापुढे डोळे टेकवतात. व जीवनभर झोळी पसरवतात. परंतु ते दिव्य प्राप्ती वंचीत होतात. यामुळेच म्हटले जाते. 'मागून भिग मिळत नाही, परंतू न मागता मोती मिळतात' ' आता दाता वरदाता' भाग्यविधाता परमात्मा आपण सर्व व समृद्धीने युक्त सत्ययुगी स्वराज्य देतात. परमात्मा आत्म्यांना आवाहन करत आहेत की, तुम्हाला पुजारी नव्हे तर पूज्य बनायचे आहे. भिकारी नव्हे तर राज्य अधिकारी बनायचे आहे. तेव्हा आता मागणे सोडा, कारण मागणारे कधी पूज्य देवता बनत नाहीत.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com